# किरकोळ फौजदारी अर्ज क्र.२४०/२०२४ मधील अंतरिम खावटीच्या अर्जावरील आदेश.

प्रस्तुतच्या खटल्यामध्ये अर्जदार हिने महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम २३ नुसार अंतरिम खावटीची मागणी केली आहे.

## अर्जदार हिचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दि. १०/०२/२०११ रोजी झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या कुटुंबात नांदावयास गेली. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार ही १७ वर्षाची असताना तिला फुस लावुन व फसवणुक करुन विवाहपुर्वी शारीरिक अत्याचार केला. सदर लग्न संबंधातुन अर्जदार क्र. २ हिचा जन्म झाला आहे. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिस चाकुने वार करुन गंभीर जखमी केले होते. तसेच अर्जदारास जबरदस्तीने मोलमजुरीचे काम करुन घेत होते. सदर लग्न संबंधातुन देवांश पाठक नावाचा मुलगा झाला आहे. तो गैरअर्जदाराने स्वतः कडे ठेवुन घेतला आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अश्लील शिवीगाळ करीत होता. तसेच अर्जदाराच्या चारित्रयावर संशय घेवुन शिवीगाळ व मारहाण करीत होता. अर्जदार हिस रात्री अपरात्री घरा बाहेर काढुन देत होता. त्यामुळे दि. ०४/०९/२०२४ पासुन अर्जदार ही वेगळी राहत आहे. अर्जदाराची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे व उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदार क्र. १ हा मजुरी करतो व दररोज रु. ५००/– कमवितो त्यामुळे अर्जदार क्र. १ हिस दरमहा रु. दहा हजार व अर्जदार क्र. २ हिस दर महा रु. पाच हजार अंतरिम खावटी मंजुर करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी आपला लेखी जवाब नि.क्र. ७ वर सादर करुन अशी हरकत घेतली आहे की, अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ सोबत भाड्याच्या खोलीत राहत होती. गैरअर्जदार क्र. २ यांच्याशी काहीही संबंध नाही.

गैरअर्जदार क्र. १ याला अन्ननिलीकेचा आजार आहे त्यामुळे शस्त्रक्रिया केली व सेवाग्राम येथे उपचार घेतला. त्या दरम्यान अर्जदार क्र. १ हिची आर्य समाज मंदिरातील संतोष राउत याच्या सोबत मैत्री झाली व त्याचे रुपांतर प्रेमात झाले. अर्जदार हिस गैरअर्जदार क्र. १ सोबत संसार करावयाचा नव्हता त्यामुळे दि. ०४/०९/२०२४ रोजी नोटरी फारकतीवर सह्या केल्या. त्यापुर्वी गैरअर्जदार याला मारहाण करण्यास आली होती. अर्जदार क्र. १ ही संतोष राउत याच्या सोबत गाडीवर फिरत होती व तो अर्जदाराचा खर्च उचलत होता. अर्जदार हिने फाशी घेवुन जिव देण्याची धमकी दिली त्यामुळे कोणताही मजकुर न वाचता गैरअर्जदार याने त्यावर सही केली. गैरअर्जदार हा कुठेही कामाला गेला तर शिवीगाळ करुन कामावर न ठेवण्याची धमकी देत असते. अर्जदार क्र. १ ही नोकरी करीत असल्यामुळे स्वतःचा व मुलीचा उदरनिवार्हा चालविण्यास समर्थ आहे त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जदार व गैरअर्जदार याचे कथन व अभिलेखावरील कागदपत्रावरुन खालील मुद्दे विचारार्थी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिचा गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी शारीरिक व मानसिक छळ केल्याचे सकृतदर्शनी शाबीत केले आहे काय ? | ...नकारार्थी |
| २. | अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे गैरअर्जदाराकडून अंतरिम खावटी मिळणेस पात्र आहे काय ? | ....नकारार्थी |
| ३. | काय आदेश ? | ..अंतिम |

| | | |
|---|---|---|
| | | आदेशानुसार. |

## कारणमीमांसा

५. अर्जदार हिने आपल्या अर्जाच्या समर्थनास लग्नाचा फोटो, आधार कार्डाची छायांकित प्रत सादर केली आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांचा **रजनिशी – वि– नेहा, फौजदार अपील क्र. ७३०/२०२०** मधील निर्देशानुसार मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र निशाणी क्र.८ वर सादर केले आहे.

६. गैरअर्जदार याने आपल्या बचावामध्ये कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाही. तसेच निर्देश देवुनही मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्र देखिल सादर केलेले नाही.

७. अर्जदारा व गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

<u>मुद्दा क्र.१ ते ३ साठी</u> –

८. महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ च्या कलम २० नुसार पिडीतग्रस्त महिलांना पोटगी देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. तसेच कलम २३ नुसार कलम २० मधील पोटगी ही अर्ज दाखल झाल्यानंतर मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम स्वरुपात देण्याचा अधिकार देखील आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांना लग्न संबंधातुन निर्माण झालेले नातेसंबंध मान्य असल्याचे स्पष्ट होते. तसेच अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे सहभागी निवासस्थानामध्ये राहत होते. तसेच सदर लग्न संबंधातुन एक मुलगा व एक मुलगी झाली असुन मुलगा गैरअर्जदार क्र. १ याच्या ताब्यात आहे व मुलगी अर्जदार हिच्या ताब्यात असल्याचे स्पष्ट होते. त्यावरुन अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांच्या मध्ये कौटुंबिक नातेसंबंध असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार हिच्या कथनावरुन गैरअर्जदार क्र. २ हा तिचा सासरा आहे. त्याने मुलाला हिसकावुन घेतल्याचा आरोप केलेला आहे. जरी गैरअर्जदार क्र. २ याने

कौटंबिक नातेसंबंध नाकारले असले तरी अर्जदार हिच्या कथनावरुन प्रथमदर्शनी त्यांच्या मध्ये कौटुंबिक नातेसंबंध असल्याचे स्पष्ट होते.

९. अर्जदार हिच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिच्या चारित्रयावर संशय घेवुन तिला शिवीगाळ व मारहाण करीत होता. त्यामुळे दि. ०४/०९/२०२४ पासुन त्रासाला कंटाळुन वेगळी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ याने त्यास अन्ननलीकेचा आजार आहे. त्याच्या उपचारा दरम्यान अर्जदार क्र. १ हिचा संतोष राउत याच्या सोबत प्रेम संबंध निर्माण झाले. त्यामुळे गैरअर्जदारा पासुन दि. ०४/०९/२०२४ रोजी नोटरी फारकती लिहुन घेतली. संतोष राउत हा तिच्या सोबत फिरतो व घरखर्च चालवितो असा स्पष्ट बचाव घेतलेला आहे. अर्जदाराने केलेले आरोपी जेवढया गंभीर स्वरुपाचे आहेत तेवढेच गैरअर्जदार क्र. १ याने घेतलेला बचाव देखिल गंभीर स्वरुपाचा आहे. अर्जदार हिने तिला होत असलेल्या त्रासा बद्दल इतर कुठेही तक्रार केल्याचे दिसुन येत नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ याने ज्या दिवशी फारकती लिहुन घेतल्याचे सांगितले आहे, त्या दिवशी पासुन अर्जदार ही वेगळी राहत असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार क्र. १ यास मारहाण झाल्याचा देखिल बचाव घेतलेला आहे. गैरअर्जदार क्र. १ याने नावानिशी अर्जदार क्र. १ हिच्या चारित्रयावर शंका निर्माण केली आहे. त्यामुळे वरील परिस्थीतीचा विचार करता केवळ अर्जदार हिच्या कथनावरुन तिचा कौटुंबिक छळ झाल्याचा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. यदाकदाचित पुराव्या अंती अर्जदार हिला खटल्या मध्ये यश आले तर तीला मुख्य अर्ज दाखल तारखेपासुन खावटी मागण्याचा अधिकार राहील. त्यामुळे या स्टेजला प्रथमदर्शनी कौटुंबिक छळ झाल्याचा निष्कर्ष काढणे योग्य ठरणारे नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ व मुद्दा क्र. २ साठी नकारार्थी उत्तर नोंदवुन मुद्दा क्र. ३ साठी खालील आदेश पारित करीत आहेः–

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(ए.एच.शेख)

**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,**

दिनांकः १६/०३/२०२६.

**(न्यायालय क्र. १), अकोट.**